नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०५/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

दि. १६/०५/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीता फिरत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली कि, मौजा धनी शिवार येथे टाटा एस गाडी क्र. एम.एच.— ४०/ सी.एम. ७०७५ मध्ये गोवंशाची कत्तलीसाठी अवैध्यरित्या वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या खबरे वरून मौजा धनी शिवार येथे पोहचुन नाकाबंदी केली असता टाटा एस गाडी क्र. एम.एच.— ४०/सी. एम. ७०७५ चा चालक **आरोपी नामे— राजु दिगांबर वंजारी वय २९ वर्ष रा. तारसा ता. मौदा** याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ०६ लहान मोठे गोरे व १ गाय असे एकुण ७ गोवंश बेकायदेशीरपणे गोवंशाचे पाय बांधुन निर्दयतेने, क्लेशदायकपणे कोंबुन चा—यापाण्याची व्यवस्था न करता गोवंशाची कत्तलीकरीता वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदर गाडी चालक यास वाहनाचे कागदपत्रे व गाडीतील लहान मोठे गोवंश बाबत कागदपत्रे विचारले असता सदर कागदपत्रे नसुन सदर वाहनाचा स्वत: चालक/मालक असल्याचे सांगितल्याने आरोपीच्या ताब्यातील टाटा एस गाडी क्र. एम. एच.— ४०/ सी. एम.— ७०७५ किंमती ५,००,०००/— रू. व त्यामध्ये ०६ लहान मोठे गोरे व १ गाय असे एकुण ७ गोवंश किंमती ५५,०००/— रू. असा एकुण ५,५५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन अरोली येथे कलम ११(१)(ड) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधिनीयम १९६०, सहकलम ५ अ(२), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधीनीयम १९९५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलिस स्टेशन अरोली सपोनि निशांत फुलेकर, पोहवा श्याम पोकळे यांनी पार पाडली.



## घरफोडी करणारे आरोपीतांना केले नागपूर ग्रामीण पोलीसांनी अटक

पोलीस स्टेशन काटोल नागपुर (ग्रा.) येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने मा. वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे काटोल येथे दाखल असलेले १) अप क्र. ३६४/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८०, भा.द.वि, २) अप क्र. ३७६/२०२४ कलम ३७९ भादंवि. तसेच पोलीस स्टेशन कोंढाळी ३) अप. क्र. ३८३/२०२४ कलम ३७९ भा.द.वि, ४) अप क्र. ३७७/२०२४ कलम ३७९ भादवि या गुन्हयातील अज्ञात आरोपीचा कसोशीने शोध घेवुन सराईत गुन्हेगार **आरोपी नामे – आकाश दिलीप सयाम, वय २४ वर्ष रा. मरामाय नगर काटोल** याला ताब्यात घेवुन कौशल्यपुर्ण तपास करुन त्याचे कडुन पोस्टे काटोल अंतर्गत काटोल शहरातील ०१ घरफोडी, ईसापुर येथील ०१ मोटर सायकल चोरीचा गुन्हा व पो.स्टे. कोंढाळी येथील ०२ मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघड करुन आरोपी कडुन १) नगदी १८००/– रुपये २) स्प्लेंडर मोसा क्र. एम. एच.–४०/एस.–४३५७ किंमती २०,०००/– रुपये ३) एक स्प्लेंडर प्लस मोटर सायकल क्र. MH-40/X 0747 किंमती २७,०००/– रुपये ४) मोटरसायकल क्र. MH 40 AB 6257 किंमती ६०,०००/– रुपये असा एकुण किंमती १०८,८००/–रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात काटोल गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आलेले आहे. आरोपीचा साथीदार राहुल रायबाजी उईके रा. काटोल याचा शोध घेणे सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. श्री. बापु रोहम उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोस्टे काटोल श्री. निशांत मेश्राम, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/शिवाजी नागवे, पोउपनि गजानन कंगाले, पो.हवा. कैलास उईके, पो.ना भुषन मदनकर, पो. शि. गौरव बखाल यांनी पार पाडली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर